**भारत-चीन सीमा व्यवहारांवरील सल्लामसलत आणि समन्वयासाठी कार्य यंत्रणेची 33 वी बैठक (25 मार्च 2025)**

25 मार्च 2025

भारत-चीन सीमा व्यवहारांवरील सल्लामसलत आणि समन्वयासाठी कार्य यंत्रणेची (WMCC) 33 वी बैठक 25 मार्च 2025 रोजी बीजिंग येथे आयोजित करण्यात आली होती. भारतीय शिष्टमंडळाचे नेतृत्व सहसचिव (पूर्व आशिया) श्री. गौरांगलाल दास आणि चिनी शिष्टमंडळाचे नेतृत्व चीनच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाच्या सीमा आणि सागरी व्यवहार विभागाचे महासंचालक श्री. हाँग लियांग यांनी केले.

2. सकारात्मक आणि रचनात्मक वातावरणात झालेल्या या बैठकीत भारत-चीन सीमा क्षेत्रांतील प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरील परिस्थितीचा सर्वसमावेशक आढावा घेण्यात आला. एकूणच द्विपक्षीय संबंधांच्या सुरळीत विकासासाठी सीमेवर शांतता आणि स्थैर्य महत्त्वाचे आहे. डिसेंबर 2024 मध्ये बीजिंग येथे झालेल्या भारत-चीन सीमा प्रश्नावरील विशेष प्रतिनिधींच्या 23 व्या बैठकीत घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करण्यासाठी आणि प्रभावी सीमा व्यवस्थापन पुढे नेण्यासाठी उभय बाजूंनी विविध उपाययोजना आणि प्रस्तावांवर चर्चा केली. या उद्देशासाठी संबंधित राजनैतिक आणि लष्करी यंत्रणा कायम ठेवण्यास आणि मजबूत करण्यास उभय बाजूंनी सहमती दर्शविली. त्यांनी सीमापार नद्या आणि कैलास-मानसरोवर यात्रा यासह सीमापार सहकार्य आणि देवाणघेवाण लवकरात लवकर सुरू करण्याबाबतही विचारविनिमय केला.

3. या वर्षाच्या अखेरीस भारतात आयोजित करण्यात येणाऱ्या विशेष प्रतिनिधींच्या (SR) पुढील बैठकीसाठी भरीव तयारी करण्यासाठी उभय पक्षांनी एकत्र काम करण्यास सहमती दर्शविली.

4. भारतीय शिष्टमंडळाच्या नेत्यांनी सहाय्यक परराष्ट्र मंत्री महामहिम श्री. हाँग लेई यांची शिष्टाचार भेट घेतली.

नवी दिल्ली

25 मार्च 2025